सकाळ



**लंडन :** के. के वाघ शिक्षण संस्थेच्या लंडनमधील माजी विद्यार्थी मेळाव्यास उपस्थित मान्यवर.

# ‘वाघ’च्या माजी विद्यार्थ्यांचा लंडनला मेळावा

## ६२ माजी विद्यार्थ्यांचा सहभाग; आठवणींना उजाळा

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ७ : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन व शाळांमधून शिक्षण घेतलेल्या व सध्या इंग्लंडमध्ये नोकरीनिमित्त स्थायिक झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नुकताच लंडनमधील हॉटेल सेंट एर्मिन हॉटेलमध्ये उत्साहात संपन्न झाला. मेळाव्यास ६२ माजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

लंडन येथे विविध उच्च पदावर संस्थेचे माजी विद्यार्थी कार्यरत आहेत. या सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी लंडन येथे माजी विद्यार्थी मेळावा आयोजनाची कल्पना मांडली. त्यास माजी विद्यार्थ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत हा मेळावा यशस्वी केला.

याप्रसंगी समीर वाघ यांच्यासह युकेमधील एचसीएल टेक्नॉलॉजीचे सहायक उपाध्यक्ष रामयाग पांड्या, नेटवर्किंगचे विभागीय इंजिनिअर चंद्रशेखर ढाके, उद्योजक सानंद सावदेकर व स्टॅटर्जी कंपनीचे संचालक प्रणव कापडिया आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला अधिष्ठाता डॉ. प्रीती भामरे यांनी प्रास्ताविकात गेल्या ५५ वर्षांत संस्थेने केलेल्या कार्याचा तपशील व सविस्तर माहिती पीपीटी द्वारे दिली. वाघ यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत व सत्कार केला.

युके येथील एचसीएल टेक्नॉलॉजीसचे सहायक उपाध्यक्ष रामयाग पांड्या, नेटवर्किंगचे विभागीय इंजिनिअर चंद्रशेखर ढाके, जेपी मॉर्गन ॲन्ड चेसच्या लिड सॉफ्टवेअर विभागाच्या उपाध्यक्षा स्नेहा मुजुमदार, आय. डब्लू.जी प्रा.लि.चे वरिष्ठ व्यवस्थापक स्वप्नील काकड, कुलिनरी शेफ ॲन्ड डिलिव्हरीज लिमिटेडचे संचालक अजय पेहेरकर, एन.एच.एस. च्या एमर्जिंग मेडिसिनचे सल्लागार डॉ. वैभव देशपांडे, अल्फा रुटीन लिमिटेडचे संचालक ऋतुजा यादव, टीसीएसचे ए.आय सल्लागार आशिष कौल व यु.के. ॲमडोक्स लिमिटेड प्रोजेक्ट मॅनेजर या माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

माजी विद्यार्थ्यांनी मनोगत आपल्या शाळा व महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला. संस्थेने लंडन येथे माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन केल्याने आनंद व्यक्त केला. प्रा. के. एस. बंदी यांनी माजी विद्यार्थी मेळाव्याचे नियोजन केले. समन्वयक डॉ. डी.एम. चांदवडकर यांनी उपस्थित माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले.